
# दैनिक महा मेट्रो


शोले: पुरे पचास साल!

पान २





वर्षे : ४ थे, अंक : ८, पुणे, गुरुवार, दि. २५ डिसेंबर, २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००

RNI N0.MAHMAR2022/87390

VOL NO.4, ISSUE : 6 Pune, Thursday 25 December 2025 | Pages : 4 PRICE : 3.00


# २७ वर्षांची साथ सोडली; प्रशांत जगतापांचा राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला रामराम



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी विरोध केला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दोन्ही पक्ष एकत्र येण्याबाबत स्थापन केलेल्या समितीमधून प्रशांत जगताप यांना वगळण्यात आले. त्यामुळे नाराज झालेल्या प्रशांत जगताप यांनी शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मात्र अद्याप हा राजीनामा स्वीकारलेला नव्हता. अखेर आज त्यांनी राजीनामा दिल्याचे माध्यमांसमोर जाहीर केले.

प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्यावर काल खासदार सुप्रिया सुळे यांनी तातडीने मुंबईला भेटीसाठी बोलावले होते. सुप्रिया सुळे यांच्यासोबत चर्चा झाल्यानंतर संध्याकाळपर्यंत अंतिम निर्णय जाहीर करणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच मी राष्ट्रवादी पक्षात होतो आणि आहे असे त्यांनी काल सांगितले होते. आज मात्र जगताप यांनी माध्यमांशी संवाद साधत थेट राजीनामा दिल्याचे जाहीर केले आहे. जगताप यांच्या राजीनाम्याने शहरातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. प्रशांत जगताप यांनी २०१२ साली पुणे महानगरपालिकेचे महापौरपद स्वीकारले होते. त्यावेळी त्यांची नवी ओळख निर्माण झाली होती. आज अखेर त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची साथ सोडली आहे. ते आता इथून पुढे कुठल्या पक्षात प्रवेश करणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्राथमिक व क्रियाशील सदस्यत्वाचा आज मी राजीनामा देत आहे. आजपर्यंत दिलेल्या संधीसाठी नेतृत्वाचे मनापासून आभार! २७ वर्षांपूर्वी मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले, तेव्हा कुठल्या पदासाठी नव्हे, तर पुरोगामी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी मी कार्यरत झालो. आज २७ वर्षांनंतरही हेच एकमेव ध्येय माझ्या मनात आहे. यापुढेही पुरोगामी विचारांसाठी माझी सामाजिक व राजकीय वाटचाल सुरूच असेल. आजपर्यंत अत्यंत निष्ठेने मला साथ देणाऱ्या, यापुढेही संघर्षाच्या वाटेवर माझ्यासोबत येणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार! असं म्हणतं त्यांनी राजीनामा दिला आहे.

# शौर्यदिन कार्यक्रमासाठी पोलीस आयुक्तांकडून विजयस्तंभ परिसराची पाहणी



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

१ जानेवारी २०२६ रोजी मौजे पेरणे येथे होणाऱ्या भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळ्यासाठी येणाऱ्या लक्षावधी अनुयायांना सुरक्षितता पुरविण्याच्या पार्श्वभूमीवर आज पुणे पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार तसेच महाराष्ट्र राज्याचे कायदा व सुव्यवस्था विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता यांचे सह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विजयस्तंभ परिसराची पाहणी केली. यावेळी कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून येणाऱ्या प्रश्नांविषयी त्यांनी आयोजक व स्थानिकांशी चर्चा देखील केली.

यंदाचा उत्सव निर्विघ्नपणे तसेच कोणत्याही तणावाशिवाय पार पडणार असल्याने नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता एक जानेवारी रोजी अभिवादनासाठी यावे असे आवाहन यावेळी आयुक्तांकडून करण्यात आले.

यावेळी पुणे सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुधीर हिरेमठ , अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील , पोलिस अधीक्षक संदिपसिंह गिल , पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, संदिप भाजीभीकरे , हिंम्मतराव जाधव यांचेसह अनेक अधिकारी उपस्थित होते.

# लोकशाहीमध्ये नाराजी चालत नाही, ती घरी चालते; सुप्रिया सुळेंचे जगतापांच्या राजीनाम्यावर भाष्य



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

पुण्याच्या विकासासाठी एकत्र येऊन निवडणूक लढली पाहिजे, त्याबाबत पक्षांमध्ये चर्चा झाली आहे. त्यादृष्टीने महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेसअजित पवार गटाला बरोबर घेऊन महापालिका निवडणूक लढण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. लोकशाहीमध्ये नाराजी चालत नाही, नाराजी घरी चालते, असे सांगून त्यांनी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचे नाराजीनाट्य धुडकावून लावले.

पुणे महापालिका निवडणुकीसाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पुण्यात पाणी, कचरा, वाहतूक कोंडी, वायू-जल प्रदूषणासारखे प्रश्न गंभीर आहेत. पुण्यात चांगला बदल हवा असेल, तर महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेसला बरोबर घेऊन महापालिका निवडणुका लढण्याचा आमचा प्रयत्न असेल. त्यादृष्टीने राष्ट्रवादी, उद्धवसेना, मनसे व काँग्रेस यांच्यासमवेत आमची चर्चा सुरू आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सुळे पुढे म्हणाल्या, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी माझी भेट झालेली नाही. मात्र, स्थानिक पातळीवर चर्चा सुरू आहे. मी कोणालाही भेटायला तयार आहे. सगळ्या कार्यकर्त्यांशी बोलूनच मी अजित पवार यांच्याशी बोलणार आहे. पूर्ण शंका-निरसन होत नाही, तोपर्यंत मी पुढे जाणार नाही. सर्व जबाबदारी माझी आहे.

लोकशाहीत नाराजी चालत नाही, नाराजी घरी चालते. प्रशांत जगताप यांना मुंबईत मागील दोन दिवस चार ते सहा तास देऊन त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी मांडलेले प्रश्न रास्त आहेत. चर्चेतून मार्ग निघतो. पुण्याच्या हितासाठी चर्चा होत असेल तर, त्यामध्ये गैर काय? सगळ्या कार्यकर्त्यांचे मत विचारात घेऊनच पक्ष निर्णय घेईल. माजी नगरसेवक विशाल तांबे यांनी निवडणूक लढावी, अशी माझी इच्छा होती. घड्याळ चिन्हावर निवडणूक लढण्याबाबतची चर्चा माझ्या कानावर आलेली नाही, असे सुप्रिया सुळे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# बार्टीचे विविध क्षेत्रातील कार्य प्रशंसनीय!

## समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांचे प्रतिपादन



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय या मूल्यांचा जनमाणसात प्रचार-प्रसार करून वंचित,उपेक्षित घटकांच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून महाराष्ट्राच्या जडणघडणीत बार्टीचे योगदान प्रशंसनीय असल्याचे मत समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ- मुंडे यांनी व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेचा ४७ वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

याप्रसंगी बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विभागप्रमुख अनिल कारंडे, रवींद्र कदम, शुभांगी पाटील, डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी पुढे बोलताना मुंढे म्हणाल्या, बार्टी ही संस्था अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. त्याचा फायदा अनेकांना होत आहे.

या प्रसंगी महासंचालक वारे म्हणाले, की भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे महापुरुष होते. त्यांनी संविधान निर्मितीसाठी मोठा संघर्ष केला, त्यामुळेच या देशाला जगातील सर्वश्रेष्ठ संविधान मिळाले,त्यामुळेच या देशातील कोट्यावधी लोकांचा उधार झाला. त्यांचे विचार आपण आचरणात आणावे. त्यांच्या नावाने ही संस्था उभी आहे. या संस्थेचा लौकिक सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी वाढवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

संस्थेच्या विविध योजना तळागाळापर्यंत नेण्यासाठी चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. या वेळी वर्धापन दिना निमित्ताने घेण्यात आलेल्या क्रीडा -सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्या अधिकारी- कर्मचाऱ्यांचा सन्मान चिन्ह,प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# मानव निर्मित ‘देवराई’एक अनोखा प्रयोग

## ११९ स्थानिक प्रजातींची ५१५ वृक्ष ; अल्पभूधारकाला उत्पन्नाचे साधन

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

वनस्पती लागवडीसाठी एक आराखडा तयार केला असून एक एकर जागेत ( २०० फूट लांबी व २०० फूट रुंदी) १० बाय १० अंतरावर ग्रीड (चौरस आकाराचा खण) घेणे असे साधारणत: ४०० ग्रीडस होतात. मध्यभागी २० बाय बाय२० फुटांचे बांबूचे झोपडे बांधले.शेजारी २० बाय २० फुटाची पाण्याचा तलाव करणे, प्रत्येक ग्रीडमध्ये एक रोपटे लावणे. साधारणत: एकमेका शेजारील चार ग्रीडमध्ये ४ सारख्या प्रकारची रोपे लावणे. म्हणजे भविष्यात ही चार रोपे एकमेकांच्या सहवासात चांगली वाढतात. अशी ११९ प्रजातीची स्थानिक ,देशी लहान मोठी झाडे,वेली, झुडूप सुमारे ५१५ रोपटी लावल्याने त्यांची वाढ योग्य होईल. अशी रोपांची निवड करून लागवड केली जाते.त्यासाठी ड्रीप आठवड्या तीन वेळा सुरुवातीस अर्धा तास पाणी देणे, संरक्षणासाठी कुंपण करणे, अथवा चर घेणे. अशा मानव निर्मित देवराईचे अनेक फायदे आहेत.त्यातील महत्वाचे काही खालील प्रमाणे

१)झाडाची लायब्ररी (ग्रंथालय) तयार होते. जशी पुस्तके वेगवेगळया खणात ठेवली जातात. त्याचा एक नकाशा असतो. त्या ठिकाणा प्रमाणे प्रत्येक जण त्या खणात जाऊन वाचू शकतो तसेच झाडांचे सुद्धा प्रत्येक ग्रीडला क्रमांका नुसार रोपांची रचना व लागवड केल्यामुळे झाड वाचू शकते.त्याचे खोड, पान, फुल, फळ ते पाहून वाचू शकतो. आता झाडे कागदावर न वाचता प्रत्यक्षात वाचली गेली तर त्या झाडाविषयी आत्मीयता निर्माण होईल वृक्ष लागवडीच्या संवर्धनाला चालना मिळेल

२)सीड बँक या देवराईत आपल्याला लाखो बिया मिळतील त्यापासून कायम स्वरुपाची दरवर्षी बिया मिळून संपूर्ण जिल्ह्यातील वृक्ष लागवडीसाठी रोपे तयार डोऊ शकतील. ३) हवेमार्फत पक्षामार्फत, मधमाशा, फुलपाखरांमार्फत लाखो बियांचे प्रसरण होऊ अनेक बिया रूजून पूर्वी सारखी जंगल निर्माण होण्यास मदत होईल.

४)सदर देवराईत पॉझिटीव्ह (+) एनर्जी ७५० असल्यामुळे (इतरत ठिकाणी साधाणत: ३५० असते.) त्या देवराईत ध्यान करू शकतो.वाढदिवस साजरे करणे, बारसे करणे, गाव बैठक घेणे इत्यादी प्रकारे उपयोग होऊ शकतो. कृषी प्रर्यटन केंद्रासाठी हा एक अभिनव प्रकल्प आहे. तसेच देवराई एक प्रकारची ऑक्सिजन बँक होऊ शकते. अनेक सजीवांना आश्रय स्थान मिळेल, कायमस्वरूपी अन्न-पाण्याची सोय होऊ शकते. मातीची धूप थांबते. हवेतील प्रदूषीत धुलीकण रोखण्यास मदत होते. अशी ही मानव निर्मित देवराई ही काळाची गरज असून वृक्ष लागवडीस एक प्रकारची दिशा देणारी दिशादर्शक देवराई आहे. ज्यांना कोणाला वैयक्तिक अथवा गावपातळीवर देवराई उभारायची असेल त्यांना रोप लागवडी आराखडा व रोपे विनामूल्य दिली जातील. तसेच संपूर्ण मार्गदशन केले जाते.

आता पर्यंत महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर ३६ देवराया उभ्या राहिल्या आहेत. त्यात रोपांचे जगण्याचे प्रमाण ९९ टक्के पर्यंत असल्याचे देवराई फाऊंडेशनचे रघुनाथ ढोल यांनी सांगितले.

# राज्यातील महायुतीच्या प्रयोगाने पुण्यात शिंदेसेनेला बळ!

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

राज्यात महायुतीचे राज्य स्थापन झाले आणि सर्वच राजकीय समीकरणे बदलली. याचा परिणाम स्थानिक राजकारणावर झालेला दिसत आहे. विशेष म्हणजे, विविध कारणांनी तारीख पे तारीख पुढे ढकललेल्या महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आणि स्थानिक राजकारणाने वेग घेतला. यात राज्यातील राजकीय समीकरणांचा परिणाम झाला नसता तरच नवल. याच महायुतीचा फायदा घेत ठाणे जिल्ह्यापुरते मर्यादित समजले जाणारे एकनाथ शिंदे पुण्याच्या राजकारणातही स्वत:चे वेगळे ठाण मांडताना दिसत आहेत. सत्तेत असल्याची ताकद वापरून शिंदे यांनी शिंदेसेना पक्ष वाढीचा सपाटा लावला आणि त्यांना पुण्यात अधिक बळ मिळताना दिसत आहे.



पुणे शहरात आजरोजी मुख्य लढत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी होणार असल्याचे चित्र दिसत आहे; पण यातून निर्माण होणाऱ्या पोकळीचा अचूक लाभ शिंदेसेना घेईल, अशी शक्यता तज्ज्ञ मंडळी व्यक्त करीत आहेत. या निवडणुकीत खासकरून पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या तिघाडी सरकारच्या तिनही नेतृत्वाची कस येथे लागणार आहे.

मिशन पुणेच्या माध्यमातून शिंदेसेनेने उद्धवसेनेतील नाराज नेते आणि काँग्रेसच्या नेतृत्वातून बाहेर पडणारे नेते शिंदे यांच्या शिंदेसेनेत प्रवेश करतील, असा प्रयत्न करीत आहेत. यातून शिंदेसेनेचे बळ वाढणार आहे. पक्षफुटीपासूनच एकनाथ शिंदे यांच्यासोबत एकनिष्ठ राहिलेले पुणे शहराध्यक्ष प्रमोद नाना भानगिरे आणि काँग्रेसला राम राम करून शिंदेसेनेत दाखल झालेले माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी शिंदेसेना पक्षाला बळ देण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसत आहे.

त्यातच ऐन महापालिका निवडणुकांच्या तोंडावर, अवघ्या काही दिवसांपूर्वीच माजी उपमहापौर आबा बागुल यांनी शिंदेसेनेचा झेंडा हाती घेतल्याने पक्ष बळकट होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यामुळे शिंदेसेना पुण्यातील राजकीय चित्र बदलेल, अशी शक्यता व्यक्त केली जाऊ लागली आहे. यातच शिंदेसेनेने महापालिका निवडणुकीसाठी मेगा प्लॅन आखला असल्याचे बोलले जात आहे. असे असले, तरी त्यांना प्रमुख लढत विरोधकांसोबतच सत्ताधारी पक्षातील मित्रपक्षांसोबत करावी लागणार आहे. त्यामुळे निवडणुकांतील गणिते जुळवून आणण्यासाठी कट्टर हिंदुत्त्ववादी संघटनांशीही युती केली आहे. पतित पावन संघटना आणि शिंदेसेनेची युती वेगळे गणित मांडणार आहे.

संपादकीय....

# हुक्क्यामध्ये फक्त निकोटिन!

## 'फॉरेन्सिक'चा अहवाल; गांजा आढळल्यास एक लाख रूपये दंड व दहा वर्षे शिक्षेची तरतूद

शहरातील हॉटेलमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरमध्ये दिल्या जाणाऱ्या हुक्क्यामध्ये गांजा असल्याचे सर्वश्रुत आहे. मात्र, हुक्क्यामध्ये फक्त निकोटिनसह विविध फ्लेवर असल्याचे न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा (फॉरेन्सिक) विभागाने अहवाल देते. हुक्क्यामध्ये अमली पदार्थ विशेषत: गांजा आढळल्यास संबंधित हॉटेल चालकाला एक लाख रूपये दंड आणि दहा वर्षे शिक्षेची तरतूद आहे. मात्र, गेली कित्येक वर्षांत हुक्क्यामध्ये अशा प्रकारचे अमली पदार्थ आढळलेच नसल्याचा निर्वाळा 'फॉरेन्सिक' विभागाने दिला आहे.

शहरात कोणकोणत्या हॉटेल्समध्ये हुक्का सुरु आहे, याची गुन्हे शाखेकडे असते. यासह स्थानिक सर्वच पोलिस ठाण्यांना असते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक त्यांच्या हद्दीत सुरू असलेल्या हॉटेल्सना तोंडी व लेखी तंबी वेळोवेळी देतात. विमानगर, येरवडा व कोरेगाव पार्क, चंदननगर यासह चतु:शृंगी पोलीस ठाण्याने काहींनी हॉटेल्समधील व हर्बलच्या नावाखाली सुरू असलेल्या हुक्का पार्लरमधील नुमने पडताळण्यासाठी गृह विभागाच्या 'फॉरेन्सिक' मध्ये पाठविले होते. या संदर्भात तेथे चौकशी केल्यानंतर हुक्क्यामध्ये निकोटिनसह विविध फ्लेवर असल्याची माहिती समोर आली. दरम्यान, अंमली पदार्थ विरोधी पथकाने शहरातील विविध ठिकाणी छापे मारून सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनीमय) अधिनियमा अंतर्गत व अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलमाअंतर्गत नियमांचे उल्लंघन केलेल्यांवर कारवाई करून तंबाखुजन्य उत्पादने व सिगारेट, फ्लेवर तंबाखुजन्य उत्पादने जप्त केली आहेत. मात्र, ही तात्पुरती कारवाई आहे. गांजाची रोपे लावणे, ती जवळ बाळगणे गुन्हा आहे. या गुन्ह्यात एक लाख रूपये दंड व दहा वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे व्यसनाधिन युवकांना शहरातील हॉटेल्समध्ये मिळणाऱ्या हुक्क्यामधून गांजाची तलफ भागविता येते. व्यसनमुक्ती केंद्रातील डॉक्टर, समुपदेशक व व्यसनमुक्त होऊन पूर्ववत आयुष्य जगणारे छातीठोकपणे हुक्क्यामध्ये गांजा असल्याचे सांगतात. मात्र, पोलिस हुक्का पार्लरवर कारवाई करून येथील नुमने फॉरेन्सिक विभागात पाठवितात. तेथे नुमन्यांचे रासायनिक विश्लेषण होते. त्याचा अहवाल पोलिसांना पाठविला जातो. दरम्यानच्या प्रवासात हुक्क्यात (गांजा हवेत उडून जाऊन) फक्त निकोटिनचा अंश शिल्लक राहतो. याचा फायदा हुक्का चालकांना मिळतो. गेली कित्येक वर्षांत कोणत्याच हॉटेल चालकांच्या हुक्क्यात गांजा आढळलेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना शिक्षा झाल्याची माहिती समोर येत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दर महिन्याला शहरातील पाच ते सहा हॉटेल्सच्या हुक्का पार्लरमधील नुमने संबंधित पोलिस ठाण्यातुन प्राप्त होतात. हुक्क्यामधील द्रावणाचे रासायनिक विश्लेषण केल्यानंतर त्यामध्ये निकोटिन व काही फ्लेवर आढळतात. त्याचा अहवाल पोलिस ठाण्यांना पाठवत असल्याची माहिती न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून देण्यात येते.

**हुक्क्यामध्ये अमलीपदार्थ गांजा, ब्राऊनशुगरसह सुंगधी द्रव्य**

पुणे शहरात सुरू असलेल्या हॉटेलमधील हुक्का पार्लरमध्ये ग्राहकांना गांजा, ब्राऊनशुगरची तलफ हुक्क्याच्या माध्यमातून भागविली जाते. त्यामुळे हुक्का ओढल्यानंतर अधिकच झिंग येते. त्यामुळे हुक्का ओढणारी व्यक्ती व्यसनाच्या आहारी जात असल्याचे व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेणाऱ्या युवकाने सांगितले. याला व्यसनमुक्ती केंद्रातील समुपदेशकांनी दुजोरा दिला आहे.


पुणे शहर पोलिस आयुक्तालयातील अमलीपदार्थ विरोधी पथकाला गुंगारा देऊन शहरातील हॉटेल्सवाले राजरोसपणे हुक्का पार्लरमध्ये गांजा, ब्राऊनशुगर आदी वापरत असल्याचे आढळून आले आहे. हुक्का पार्लर चालकांना कोणा, कोणाची मर्जी सांभाळावी लागते याची यादीत त्यांच्याकडे असते. या यादीत अग्रक्रमावर अमलीपदार्थ विरोधी पथकाचे नाव असते. त्यानंतर गुन्हेशाखा, स्थानिक पोलिस ठाण्यातील अधिकारीच नव्हे तर गस्तीवर असणाऱ्या बीट मार्शलची सुध्दा त्यांना मर्जी सांभाळावी लागते. त्यामुळे हुक्क्यामध्ये 'हर्बल' पदार्थ वापरले जातात हा युक्तीवाद फोल ठरतो. तर हुक्क्यामध्ये अमलीपदार्थ घातले जात असल्याचे पुरावे प्रत्यक्षदर्शी नव्हे तर व्यसनाधिन झालेले व आता उपचार घेत असलेल्या रुग्णांनी सांगितले.यासह अशा रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर व समुपदेशकांनी सुध्दा याला दुजोरा दिला आहे.

हुक्क्यामध्ये गांजा, ब्राऊनशुगर टाकत असण्याची दाट शक्यता आहे. व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी आलेल्या रुग्णांच्या आरोग्य तपासणी अहवालात आढळून येत असल्याचे मत शहरातील व्यसनमुक्ती केंद्रातील समुपदेशकांचे आहेत. तर

सुरवातीला गंमत म्हणून मित्रांसोबत हुक्का पॉर्लरमध्ये जात होता. तेथे हुक्का ओढणाऱ्या मुलींचे आकर्षण वाटत होते. हुक्क्यामध्ये गांजा, ब्राऊनशुगर टाकले जात होते. व्यसनाधिन झाल्यानंतर 'विड्रॉल'अवस्था झाली होती. काय करतो, काय बोलतो याचे भान राहत नव्हते. पालकांनी मला व्यसनमुक्ती केंद्रात टाकल्यामुळे आता थोडे बरे वाटत असल्याची प्रतिक्रिया काही युवकांनी दिल्या आहेत.

या घटना सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र असलेल्य पुणे शहरात दररोज घडत आहेत. यांच्यावर जरब कोण बसविणार असा प्रश्न आहे. कारण खाल पासून वर पर्यंत व्यवस्था भ्रष्ट झाली आहे. यावर वेळीच उपायोजना करण्याची गरज आहे .

# शोले: पुरे पचास साल!




## Untold Angel!

**गब्बर, जय, विरू आणि जेल!**

शोले सिनेमा हा डकैती म्हणजे दरोडेखोरांच्या विषयाला वाहिलेला सिनेमा होता. त्यामुळे पोलीस, वकील, जेल, हाणामारी, हिंसाचार या गोष्टी ओघाने आल्याच! शोलेवर बऱ्याच जणांनी, बरंच काही लिहिले, पण त्यांच्या नजरेतून सुटलेल्या गोष्टी मी इथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

शेवटी काय

*क्यूँ देखे दुनिया को, दूसरोंकी नजर से हम!*

*ले दे के अपने पास एक नजर ही तो है!*

असं साहिर लुधियानवीने म्हटल्याप्रमाणे एखाद्या विषयाकडे स्वतःच्या नजरेनं बघणं, वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या दृष्टिकोनातून बघणं हे कधीही चांगलं. एखाद्या विषयावर त्याच त्याच पद्धतीने आणि तेच तेच लिहिण्यात काय मजा? असो!

तर शोले सिनेमा विषयी मला जे वेगळं आणि वेगळ्या ऍन्गलने सांगायचं आहे ते हे की, यात गब्बरला न्यायालयात आणतात, आणि दिग्दर्शकीय आणि एडिटिंगचं कौशल्य हे की यात प्रत्यक्ष न्यायालय , न्यायाधीश, वकील वगैरे या पात्रांना फाटा देण्यात आला. आणि न्यायालयाच्या आवारातून चार पाच पोलीस गब्बरला बेड्या घालून आणतानाचा म्हणजे जेलमध्ये रवानगी करण्यासाठी नेताना दाखविले आहेत, आणि न्यायाधीशांचा शिक्षा सुनावतानाचा केवळ पार्श्वभूमीवर आवाज ऐकू येतो, की लूटमार, दरोडेखोरी यासाठी गब्बरला वीस वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. इथे जर न्यायालयीन कामकाजाची दृश्ये चित्रित केली असती तर सिनेमाची लांबी आणखी वाढली असती, पात्रही वाढली असती.

न्यायालयाच्या आवारातून गब्बरला पोलीस घेऊन जात असताना, मध्येच गब्बरचा ठाकूरशी सामना होतो, तेंव्हा गब्बर आणि ठाकूर मध्ये पुन्हा एकदा शाब्दिक चकमक होते.

गब्बर म्हणतो याद रखुंगा, तुझे याद रखुंगा

ठाकूर तितक्याच आत्मविश्वासाने आणि ठामपणे म्हणतो बीस बरस जेलमें रहने के बाद सब भूल जाओगे गब्बर

यावर गब्बरही निडरपणे म्हणतो दुनिया की किसी जेल की दीवार इतनी पक्की नहीं, के गब्बर को रोक सके, और जिस दिन मै भाग निकला, बहुत पछतोओगे ठाकूर, बहुत पछतोओगे

पोलिस गब्बरला घेऊन ठाकूरच्या पुढे उजव्या बाजूला जातात, फ्रेममध्ये फक्त ठाकूर राहतो आणि दुरून गब्बरचा आवाज येत राहतो मुझसे दुश्मनी बहुत महेंगी पडेगी ठाकूर, बहुत महेंगी पडेगी, बहुत महेंगी!

आणि ठाकूर ज्या फ्रेममध्ये असतो ती तशीच राहते आणि गब्बरचा आवाज संपून काही क्षण सरताच डाव्या बाजूने जेलर विकास आनंद यांचा आवाज येतो (आधी फक्त आवाज येतो आणि नंतर जसजसा आवाज जवळपास येतो, जेलर फ्रेम मध्ये येतो! ) ठाकूर साहब मुबारक हो, आपका एक और कैदी हमारी जेल में आ रहा है

ठाकूर म्हणतो आदमी खतरनाक है जेलर साहब, खयाल रखिये!

आणि इथे हे न्यायालयाचे लोकेशनवरील दृश्य संपते.

शोले सिनेमा जिथून सुरू होतो तो याच जेलरपासून सुरु होतो, हे आपल्याला आठवत असेल. खरंतर तो जेलर वेगळा हा जेलर वेगळा असंही रमेश सिप्पी यांना करता आले असते, पण इथे पात्रांची बचतही झाली आणि सिनेमाची कंटिन्युटीही राहिली!

गब्बर, ठाकूर आणि जेलर या तिघांच्या छोट्या पण आशयपूर्ण संवादातून सिनेमा पुढे गतीशीलरित्या सरकत जातो, हेच या सिनेमाच्या दिग्दर्शन आणि एडिटिंगचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. ज्याला खऱ्या अर्थाने फिल्म मेकिंग आणि आदर्श फिल्म एडिटिंग शिकायचं आहे त्यांच्यासाठी शोले सिनेमाची एकेक दृश्य, एकेक फ्रेम त्या दृष्टीने बघणं, अभ्यासानं महत्वाचं आहे.

या दृश्या नंतर गब्बर थेट पळून गेलेला दाखवलेला आहे. ना जेल दाखविले ना तो जेल कशाप्रकारे तोडून पळाला? हे दाखवले आहे. पुन्हा ते दाखवले असते तर सिनेमाची लांबी आणखी वाढली असती. या उलट मात्र जय आणि विरू हे जेल मध्ये कसे जातात, का जातात, सुरमा भोपालीला मध्ये घालून स्वतःच पोलिसांनी ठेवलेला इनामही मिळवतात हे मात्र तपशीलवार आणि गंमती जमती घडवत दाखविले आहे.

जेलमध्ये जय विरू गेल्या नंतर तिथल्या असरानीचा विनोदी जेलरची एन्ट्री , त्याचा विनोदी जासूस केष्टो मुखर्जी उर्फ हरिनाम न्हाई, बिरबल इत्यादी अनेक कलाकारांची मांदियाळी आपल्याला बघायला मिळते. जी कदाचित गब्बरला जेलमध्ये टाकल्या पासून ते तो जेल तोडून पळेपर्यंतच्या दृश्यात दाखवता आले नसते. कारण गब्बरचे पात्र हे क्रूर, भयावह डाकूचे होते आणि जय विरूचे पात्र मात्र स्वतःहून जोखीम घेणारे, आयुष्य मौजमस्ती करत, हासत खेळत जगणाऱ्या अवलिया व्यक्तीमत्त्वाचे दाखविले आहे, त्यामुळे त्या दोघांनाही जेलमध्ये जाणे आणि तिथून पळ काढणे हा एक मजेचा खेळ वाटत असते. त्यामुळे ते सुरमा भोपालीला सांगून स्वतःच जेलमध्ये आलेले असतात आणि आता त्यांना स्वतःच जेल तोडून पळायचेही असते. त्यात योगायोगाने त्यांना असरानीच्या रुपाने एक मूर्ख जेलर भेटतो, आणि ते त्याला सहज फसवून जेलमधून पळून जातात. पण सुरमा भोपाली कडून बक्षिसाचे दोन हजार रुपये घेऊन त्याच्या वखारीतून बाहेर पडणार तोच दारात पोलीस उभे असतात, आणि त्यांची रवानगी पुन्हा जेलमध्ये होते. तिथे मात्र ते कैद्यांच्या पांढऱ्या वेशात खडी फोडताना दाखविले आहेत. आणि अर्थात तिथली शिक्षा संपल्यावर ते शोले सिनेमाचे मुख्य ध्येय, म्हणजे ठाकूरचे गब्बरला पकडण्याच्या मिशनवर रूजू होतात.

गब्बरच्या वेळी जेल, जेलर, खडी फोडणे या दृश्यांची गरज नसल्याने ते दाखविण्यात आले नाही मात्र विरू आणि जयच्या वेळी त्यांचे खुशालचेंडू जीवन , दिलखुलास पात्रे रंगविण्यासाठी दिग्दर्शकाने खुबीने सुरमा भोपाली, जेलर, जासूस न्हाई अशी विनोदी पात्रांची सुंदर पेरणी केली. रमेश सिप्पी यांच्या दिग्दर्शनाला सलाम आणि सलीम जावेद यांच्या लेखणीलाही!

■ श्रीकांत वाघ
९९२३३१६२११

# इतिहास, भूगोल आणि प्रेरणादायी वारसा : किल्ले शिवनेरी

सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतीचिन्ह आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथे प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचा लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले. मात्र, भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो. बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली.

शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय.

म्हणूनच, पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांतून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे, तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या





पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला 'कडेलोट' नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे.

किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही पूज्य मानला जातो.

आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.

शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्री लेण्या आहेत. या प्राचीन बौद्ध लेण्या उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुंफांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुंफांपर्यंतच्या चढाई दरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवर असलेली ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथली शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाच हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण पस्तीस किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नर लेण्या आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मिलाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरे तर, शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो आहे धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.

■ संजय डी.ओरके
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडस पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी क्रमांक २०–४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५, Email-mahametronews.pune@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
TC. MAHMAR51691 NO.SDM/PUNE/SR/56/2022 MAHA METRO This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात ड्रोन (रिमोट) पायलट प्रशिक्षण

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील रिमोट पायलट प्रशिक्षण संस्था ही भारतीय नागरी विमान वाहतूक महासंचालनालय मान्यताप्राप्त संस्था असून, कुशल ड्रोन पायलट घडविण्यासाठी प्रमाणित प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षणामध्ये वर्ग प्रशिक्षण, सिम्युलेटर आधारित प्रशिक्षण तसेच प्रत्यक्ष फ्लायिंग सत्रांचा समावेश आहे. संस्थेमार्फत लघु श्रेणी रिमोट पायलट प्रमाणपत्र कोर्स (७ दिवस), मध्यम श्रेणी रिमोट पायलट प्रमाणपत्र कोर्स (७ दिवस) तसेच लघु व मध्यम श्रेणी संयुक्त रिमोट पायलट प्रमाणपत्र कोर्स (१० दिवस) उपलब्ध आहेत.

या कोर्ससाठी किमान शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण असून वयोमर्यादा १८ ते ६५ वर्षे आहे. उमेदवारांकडे वैध वैद्यकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी चार पासपोर्ट आकाराचे फोटो (पांढऱ्या पार्श्वभूमिसह), दहावीची मूळ गुणपत्रिका, प्रमाणपत्र, आधार कार्ड, एक अतिरिक्त ओळखपत्र (पासपोर्ट, मतदान कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, रेशन कार्ड), वरील सर्व कागदपत्रांच्या स्वयंघोषित प्रती तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ रिमोट पायलट प्रशिक्षण संस्था, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे संपर्क साधावा. पात्र माजी सैनिकांनी दूरध्वनी क्रमांक +९१७५५०००३७०५ किंवा ई-मेल vnmkv.rpto@gmail.com वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.) यांनी केले आहे.

# आंतरजातीय , आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना पुण्यात 'सेफ हाऊस'; 'विचारवेध असोसिएशन' चा पुढाकार

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

'विचारवेध असोसिएशन'च्या पुढाकाराने आंतरजातीय,आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या युवक युवतीना विवाहानंतर पुण्यात काही काळ सुरक्षित घर ( सेफ हाऊस) सुविधा विनामूल्य उपलब्ध केली असल्याची माहिती असोसिएशनने पत्रकाद्वारे दिली.अधिक माहिती साठी अनिकेत साळवे ८७९६४०५४२९ या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

आंतरजातीय,आंतरधर्मीय विवाह संकल्पनेला समाजातून पाठिंबा देण्यासाठी 'विचारवेध असोसिएशन' कार्यरत आहे. त्या दृष्टीने काही सुस्थित, प्रतिष्ठित कुटुंबांनी अशा जोडप्यांना विवाहानंतर दोन महिने आधार देण्याची तयारी दाखवली आहे. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने हा आधार विनामूल्य असेल.बाणेर,खडकी,बावधन,औंध,केशवनगर अशा ठिकाणी ही सेफ हाऊस उपलब्ध केली आहेत.

'विचारवेध असोसिएशन'च्या पुढाकाराने आंतरजातीय,आंतरधर्मीय विवाह संकल्पनेला पाठिंबा देण्यासाठी नवे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.या उपक्रमांत इच्छुक युवक-युवतींसाठी समुपदेशन व मार्गदर्शन, आर्थिक सहाय्याचे सल्ला, जोडपे एकत्र आणण्यासाठी कार्यक्रम, व्याख्याने तसेच सुरक्षित निवासासाठी 'सेफ हाऊस' यांचा समावेश आहे. समाजात आंतरजातीय विवाहाबाबत असलेले गैरसमज दूर करून, विवाह करणाऱ्यांना आधार देण्याचा यामागचा मुख्य उद्देश आहे.

# जिल्ह्यातील उर्दू शाळांमध्ये अल्पसंख्याक हक्क दिन साजरा




पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

जिल्ह्यात पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच ग्रामीण भागातील उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये १८ डिसेंबर २०२५ रोजी अल्पसंख्याक दिन साजरा करण्यात आला.

पुणे महानगरपालिके अंतर्गत शिक्षण हक्क मंचचे संस्थापक अध्यक्ष मतीनभाई मुजावर यांच्या माध्यमिक शिक्षण विभागातील उर्दू माध्यमाच्या सर्व शाळांना एकत्र करून अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत डॉ. अल्लामा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी, आला हजरत इमाम अहमद रजा उर्दू प्राथमिक शाळा नेहरूनगर, उर्दू प्राथमिक शाळा, खराळवाडी, जाधववाडी चिखली येथे तसेच ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा उरुळी कांचन, राजगुरुनगर, मंचर येथे अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये अल्पसंख्याक हक्क, समानता व सामाजिक सलोखा याबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने शाळेत वकृत्त, निबंध व चित्रकला, भित्तीपत्र स्पर्धा आदी उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला. विजेत्या विद्यार्थ्यांना चषक (ट्राफी) व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पुणे महानगरपालिके अंतर्गत आयोजित कार्यक्रमात चांदभाई बळबट्टी यांनी अल्पसंख्याक हक्क दिन आयोजित करण्यामागील उद्देश व अल्पसंख्याकांच्या हक्कांबाबत माहिती दिली. तसेच अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्त्व, अल्पसंख्याकांचे हक्क व कर्तव्ये आदींबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी आशा उबाळे, शिक्षण हक्क मंचचे मतीनभाई मुजावर तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका उर्दू विभागातील शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक आदी उपस्थित होते.

# गॅस सिलेंडरच्या वितरकांकडे तोलन उपकरणेच नाहीत

## वैध मापन शास्त्र विभागाच्या नियमांना केराची टोपली

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

शहरातील सर्वच सिलिंडर वितरकांकडे अपुरे मनुष्यबळ, गॅस सिलिंडरची मोठी संख्या, दिवसभरात जास्तीत जास्त सिलिंडर पोचविण्याचे उद्दिष्ट त्यामुळे सिलिंडर तोलन न करताच ग्राहकांना मिळत आहे. त्यामुळे सिलेंडरमध्ये गॅस किती वजनाचा आहे, हे कळत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. अनेक गॅस वितरकांनी त्यांच्या कार्यालयातील तोलन काटे कपाटात ठेवले आहेत.तर गेली अनेक वर्षांपासून मुद्रांकन व तपासणीच करून घेतली नसल्याची माहिती समोर आली आहे. शहरात भारत व हिदुस्तान पेट्रोलियम कंपनीसह इंडेन कंपनीचे गॅस सिलेंडर वितरक आहेत. वितरक अनेक ठिकाणी होम डिलीव्हरी करतात. मात्र त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे तोलन उपकरणेच नसल्याच्या तक्रारी नागरीकांनी केल्या आहेत. त्यामुळे सिलेंडरमध्ये अचून वजनाचे गॅस असल्याची खात्री देता येत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर कित्येक ग्राहकांना गॅस सिलेंडर वजन करून घेतले जाते याची माहितीच नाही.

> "स्वयंपाकाचा गॅसचे सिलेंडर स्विकारताना त्याचे सील व्यवस्थित असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. सिलेंडर स्विकारण्यापूर्व कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या तोलन उपकरणांवर वजन तपासून पाहणे आवश्यक आहे. रिकाम्या सिलेंडरचे वजन व गॅसचे निव्वळ वजन सिलेंडरवर दर्शविण्यात आलेले असते. तसेच पावतीवर दर्शविलेले वजन पडताळून पाहता येते.''
>
> - एस.जी. महाजन,
> उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र विभाग, पुणे

वैधन मापन शास्त्र विभागाच्या कायद्या प्रमाणे तोलन उपकरणांची तपासणी व मुद्रांकन न केल्यास त्यांच्यावर खटला दाखल होऊ शकतो. तसेच वितरकांकडे तोलन यंत्र नसल्यास त्यांच्यावर पाच हजार रूपये दंडाची कारवाई होऊ शकते.मात्र अनेक वितरकांकडील तोलनयंत्र कपाटात ठेवले आहेत. तर अनेकांनी ही तोलन यंत्रांची पडताळणी व मुद्रांकनच करून घेतले नसल्याचे दिसून येत. तर शहरातील गॅस सिलिंडरची संख्या आणि वितरण करणाऱ्यां कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन पाहता प्रत्येक ग्राहकाला सिलिंडर तोलन करून देणे मोठ्या कष्टाचे काम असल्याचे मत वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सांगितले.



**गॅस सिलेंडर वजन करून देणे बंधनकारक**

वैधमापन शास्त्र विभागातर्फे विशेष अभियान घेऊन वितरकांकडील तोलन यंत्राची तपासणी केली जाते. सिलेंडरचे वजन करून न दिल्यास ग्राहकांनी नियंत्रण कक्ष ०२२- २२६२२०२२ व ०२०-२६६८३१या दूरध्वनी क्रमांकावर तक्रारी करण्याचे आवाहान वैधमापन शास्त्र विभागाने केले आहे.

# आम्हाला डावललं जातंय! निवडणुकीत ब्राह्मण समाजाला योग्य प्रतिनिधित्व द्या; समाजाचे सर्व पक्षांना आवाहन

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो



शहरात ब्राह्मण मतदारांची संख्या सुमारे १६ ते १८ टक्के इतकी असतानाही राजकीय पक्षांकडून सातत्याने ब्राह्मण उमेदवारांना डावलले जात असल्याची भावना समाजात आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत ब्राह्मण समाजाला योग्य व पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी प्राधान्याने विचार करावा, असे आवाहन सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने बुधवारी (दि.२४) करण्यात आले. या वेळी समन्वयक भालचंद्र कुलकर्णी, सह-समन्वयक ॲड. ईशानी जोशी, प्रवक्ते विश्वजीत देशपांडे, राजकीय समितीचे सदस्य विश्वनाथ भालेराव, मंदार रेडे, सुनील पारखी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये ब्राह्मण समाजातील सुमारे ५० कार्यकर्ते निवडून आले आहेत. एकट्या मराठवाड्यात पाच ठिकाणी ब्राह्मण नगराध्यक्ष निवडून आल्याचेही यावेळी सांगण्यात आले. तसेच कोकण, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातूनही मोठ्या संख्येने ब्राह्मण उमेदवारांना मतदारांनी संधी दिली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत ब्राह्मण समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवून चांगला प्रतिसाद मिळविला होता. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांमध्येही असेच परिणाम दिसून येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

याच पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांनी ब्राह्मण बहुल प्रभागांमध्ये ब्राह्मण उमेदवारांना प्राधान्य द्यावे, अशी आग्रहाची मागणी करण्यात आली आहे. विशेषतः सर्वसाधारण गटांमधून केवळ खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनाच तिकीट द्यावे व 'बी' प्रवर्गातील उमेदवारांना तिकीट देऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे सुमारे ३० संभाव्य उमेदवारांची यादीही दिली आहे. यावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिल्याचे देशपांडे यांनी सांगितले. तसेच महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) व शिवसेना (एकनाथ शिंदे) यांनाही याबाबत आवाहन करण्यात आले असून, काँग्रेस पक्षाच्या पुण्यातील नेत्यांचीही लवकरच भेट घेण्यात येणार आहे.

# निवडणुकीत वारेमाप पैशांचा वापर होण्याची शक्यता

## खर्चावर इन्कम टॅक्स विभागाचा वॉच, नागरिकांनाही तक्रार करता येणार

पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांकडून वारेमाप पैशांचा वापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीत होणाऱ्या पैशांच्या वापरावर इन्कमटॅक्स विभागाचा वॉच असणार आहे. वारेमाप खर्चाला आळा घालण्यासाठी निवडणूक काळात २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, नागरिकांनाही अशा प्रकारांविरोधात थेट तक्रार करण्याची सुविधा देण्यात आली आहे.



राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका जाहीर झाली आहे. पालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणात काही उमेदवार पैशांचा वापर करतात. निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. त्यामुळे निवडणुकीत होणाऱ्या पैशांच्या वापरावर इन्कमटॅक्स विभाग वॉच ठेवणार आहे. वारेमाप खर्चावर आळा घालण्यासाठी निवडणूक काळात २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या यंत्रणेच्या कार्यक्षेत्रात ठाणे, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, अहिल्यानगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, तसेच सांगली-मिरज-कुपवाड या महापालिका क्षेत्रांचा समावेश आहे. आचारसंहिता लागू राहील, तोपर्यंत ही यंत्रणा सक्रिय राहणार आहे.

महापालिका निवडणूक काळात येणाऱ्या तक्रारींवर त्वरित दखल घेण्यात येणार असून, संबंधित ठिकाणी छापा टाकण्यासाठी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. निवडणूक काळात पैशांचा गैरवापर होताना दिसल्यास ही माहिती इन्कम टॅक्स विभागाला कळवण्यासाठी नागरिकांना टोल फ्री क्रमांक देण्यात आला आहे. टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-०७०१ व्हॉट्सॲप क्रमांक : ९९२२३८०८०६ ईमेल आयडी : pune.pdit.invincometax.gov.in या वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीचे नेते राहुल कलाटे भाजपमध्ये; पक्षातील कार्यकर्त्यांचा विरोध डावलून दिला प्रवेश




पिंपरी - प्रतिनिधी
महा मेट्रो

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्षाचे) नेते माजी नगरसेवक राहुल कलाटे यांनी मंगळवारी भाजपत प्रवेश केला आहे. मुंबई येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत कलाटे यांचा प्रवेश झाला आहे. यावेळी आमदार शंकर जगताप, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे उपस्थित होते.

महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर अनेक दिवसांपासून राहुल कलाटे भाजपत प्रवेश करणार की राष्ट्रवादीत? या बाबतच्या चर्चांनी राजकीय वातावरण चांगले ढवळून निघाले होते. उपमुख्यमंत्री अजित पवारांनीही त्यांना बोलावले होते. तर मागील आठवड्यात कलाटे यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

त्यानंतर शनिवारी शहरातील २२ आजी-माजी पदाधिकाऱ्यांचा प्रवेश झाला होता. दरम्यान, कलाटे यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा सुरू झाल्यानंतर भाजपच्या स्थानिक नेत्यांनी विरोध दर्शविला होता. त्यानंतर कलाटे यांच्या प्रवेशाचे काय होणार? अशी चर्चा रंगली होती. त्यानंतर मंगळवारी सकाळी नऊ वाजताच कलाटे यांच्या समर्थकांनी चलो मुंबई असे स्टेटस ठेवले. त्यानंतर मुंबईत मंगळवारी (दि. २३) दुपारी प्रवेश झाला.

# प्रेमविवाह फसला; लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून जोडपे झाले वेगळे, ८ दिवसांत घटस्फोट

पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

प्रेमविवाहानंतर आयुष्य खरंतर सुखकर व्हायला हवे. एकमेकांचे स्वभाव, आवडी निवडी आधीच माहिती असल्याने गोडीगुलाबीचा संसार व्हायला हवा. पण एका प्रेमविवाह केलेल्या दाम्पत्याच्या आयुष्यात झाले उलटेच. प्रेमविवाहानंतर दुसऱ्या दिवसापासून दोघांमध्ये वाद सुरू झाला अन् ते वेगळे राहू लागले. अखेर या उच्चशिक्षित दाम्पत्याचा घटस्फोट ८ दिवसांत मंजूर झाला. कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश बी. डी. कदम यांनी हा निकाल दिला आहे.

दि. ३ डिसेंबरला दाखल केलेला दावा १० डिसेंबरला निकाली निघाला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे १८ महिन्यांपासून वेगळे राहत असल्यास ६ महिन्यांचा कालावधी वगळता येतो. या प्रकरणात दोघे १८ महिन्यांपासून वेगळे राहत आहेत. त्यामुळे हा कालावधी वगळण्याची मागणी अर्जदार वकिलांनी केली. त्यानुसार न्यायालयाने हा निकाल दिला आहे. राकेश (वय ३४) आणि स्मिता (३०) (नावे बदलली आहेत) अशी त्या दोघांची नावे आहेत. दोघांनी ॲड. राणी कांबळे-सोनावणे यांच्यामार्फत कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. दोघेही उच्चशिक्षित आहे. तो शिपवर कामाला आहे तर ती डॉक्टर आहे. १८ महिन्यांपूर्वी दोघांचा प्रेमविवाह झाला. त्याच्या शिपवरील कामावर जाण्यावरून दोघांत लग्नाच्या दुसऱ्या दिवशी वाद झाले. दोघे वेगळे राहू लागले. नातेवाईक, मित्रमंडळी आणि घरच्यांनी दोघांतील वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, यश आले नाही. त्यामुळे परस्परसंमतीने घटस्फोट घेण्यावर दोघांचे एकमत झाले. त्याला शिपवर कामाला जायचे होते. त्यामुळे दोघांनी दाखल केलेला अर्ज न्यायालयाने लवकर निकाली निघाला. दरम्यान, लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू झालेले वाद मिटले नाहीत. दोघे एकत्र येणे शक्य नव्हते. त्यामुळे परस्पर संमतीने घटस्फोटासाठी दाखल केलेला अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे, असे ॲड. राणी कांबळे-सोनावणे यांनी सांगितले.

# विनापरवानगी गैरहजर राहिले; पिंपरीत महापालिका निवडणूक प्रशिक्षणाला हजारहून अधिक शिक्षकाची दांडी

पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

पिंपरी : महापालिका निवडणुकीचे कामकाज हाताळण्याच्या प्रशिक्षणाला तब्बल १ हजार ३२९ शिक्षकांनी दांडी मारली. या प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक असताना विनापरवाना गैरहजर राहिले. निवडणुकीसारख्या राष्ट्रीय कामकाजात अडथळा निर्माण केला आहे. त्यामुळे २४६ शाळा, कॉलेजमधील १ हजार ३२९ शिक्षकांना नोटीस बजावली आहे, तसेच नोटीस मिळताच, २४ तासांत खुलासा करण्याचा इशारा आयुक्त तथा निवडणूक प्रमुख श्रावण हर्डीकर यांनी दिला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका घेण्याची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर सोपविली आहे. या निवडणूक कामकाजासाठी अधिकारी आणि कर्मचारी वर्ग उपलब्ध करण्यात येत आहे. त्यानुसार, विविध ठिकाणच्या कर्मचारी वर्ग एकत्रित करत १४ हजार मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येत आहे.

महापालिका सार्वत्रिक निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण घेण्यात येत आहे. त्या प्रशिक्षणास संबंधित कर्मचारी, शिक्षक आणि नियुक्ती केलेल्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे, परंतु प्रशिक्षणास विनापरवाना गैरहजर राहून राष्ट्रीय कामकाजात अडथळा निर्माण करून भारतीय लोकप्रतिनिधी अधिनियमन १९५१ चे कलम १३४ मधील तरतुदीचा भंग केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास येत आहे.

# महाराष्ट्र कारागृह विभागातील नवनियुक्त कारागृह शिपाई तुकडी क्र. १२३ चा दिक्षांत संचलन सोहळा संपन्न

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

येरवडा येथील दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय येथे पार पडला. सदर दिक्षांत संचलन सोहळ्यामध्ये ७० महिला प्रशिक्षणार्थी व १२९ पुरुष प्रशिक्षणार्थी असे एकुण १९९ कारागृह शिपाई प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. पाच महिन्यांच्या अथक शिस्तप्रिय प्रशिक्षणानंतर हा आकर्षक सोहळा अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा सुहास वारके यांच्या मार्गदर्शखाली तसेच या प्रशिक्षण संस्थेचे प्रमुख नितीन वायचळ, प्राचार्य यांच्या व्यवस्थापनाखाली पार पडला. कारागृह शिपाई तुकडी क्र. १२३ चे प्रतिनिधीत्व मुख्य कंमाडर प्रशिक्षणार्थी रुपाली विष्णु मलपुरे यांनी केले व त्यांनी मैदानी परिक्षामध्ये देखील प्रथम क्रमांक पटकवला तसेच सेकंड कमांडर प्रशिक्षणार्थी धनश्री केशव बेस्के हे होते. सदर कारागृह शिपाई तुकडी क्र. १२३ मध्ये वर्ग अभ्यास सर्वप्रथम प्रशिक्षणार्थी वैष्णवी भिकाजी फापाळे, नेमबाजी सर्वप्रथम प्रशिक्षणार्थी प्रसाद



बबन कातोरे व सर्वोत्कृष्ठ प्रशिक्षणार्थी वैष्णवी भिमाजी फापाळे यांनी मान पटकवला. सदर दिक्षांत संचलन सोहळ्याकरीता डॉ. दत्तात्रय देविदास पडसलगीकर, भा.पो. से. (से.नि.) गुनश्री संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रभोधिनी, (च.ख.अ.), महाराष्ट्र राज्य, पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. पडसलगीकर यांनी पोलीस विभाग, न्याय विभाग व कारागृह विभाग हे कायदा व सुव्यवस्थेतील महत्वाचे स्तंभ असुन ते एकमेकाशी सलग्न आहेत. कारागृह सेवा हि जोखीमपुर्वक असुन सध्या गुन्हयांचे व गुन्हेगारीचे स्वरुप बदलले असल्याने आपल्याला नेहमीच सतर्क राहुन व बदलत्या परिस्थितीनुसार स्वत: बदलानुरुप निरंतर सज्य राहिले पाहिजे. तसेच आधुनिक काळात सुशिक्षीत गुन्हेगार वेगवेगळे तंत्रज्ञानाचा वापर करुन सायबर सारखे व डिजीटल अरेस्ट सारखे गुन्हे करत आहेत. त्यामुळे

कारागृह विभागाने देखील अधुनिक तांत्रीक ज्ञान आत्मसात करुन अशा स्वरुपाच्या गुन्हेगारांना हाताळण्याची कला अवगत केली पाहीजे. असा सल्ला दिला.

महाराष्ट्रकारागृहविभागाचे प्रमुख मा. सुहास वारके यांनी विविध गुन्ह्यातील आरोपींना कारागृहात हाताळताना कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याचे आव्हानात्मक काम आहे. त्याकरिता आपण सर्वांनी या आव्हानांचा स्विकार करून कर्तव्यनिष्ठ राहून कारागृह प्रशासन सुरळीत चालवून मोलाचे योगदान कारागृह विभागास देणे अपेक्षित आहे. केयोगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे उपस्थित होते. या दिमाखदार सोहळ्यास इतिहासात प्रथमच कारागृहाचे अधिकारी, कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी कारागृह शिपाई यांचे नातेवाईक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच . एच. एस. मिंड, अतिरिक्त अधीक्षक, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय यांनी उपस्थितांचे आभार प्रदर्शन करून सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाल्याचे जाहीर केले.

# पुण्यातील पत्की दुहेरी खून खटल्यातील आरोपींची अखेर १५ वर्षांनी निर्दोष मुक्तता



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

कर्वेनगर येथील पत्की दुहेरी खून खटल्यात सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या आरोपींची उच्च न्यायालयाने अखेर १५ वर्षांनी निर्दोष मुक्तता केली. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश भारती चांडक व भारती डोंगरे यांनी हा निकाल दिला.

आरोपी अंबादास श्रीपाद जाधव व सहकारी, बंटी उर्फ गौरव गौतम वडवेराव , पंड्या उर्फ पांडुरंग अतुल जाधव अशी निर्दोष मुक्तता झालेल्यांची नावे आहेत. पुण्यातील कर्वे नगर येथे घरामधे घुसून आरोपींनी स्मिता पत्की आणि सुलभा पाच्छापूरकर या दोन विवाहित महिलांना जीवे ठार मारून सोने लंपास केले होते. त्यावेळेस आरोपी सापडून येत नसल्याने गदारोळ झाला होता. या प्रकरणात आरोपींना काही महिन्यांनी अटक करण्यात आली. सरकार तर्फे १३ साक्षीदार तपासण्यात आले. यात सत्र न्यायालयाने आरोपींना जन्म ठेपेची शिक्षा दिली होती. आरोपींनी निकालाला आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली.

न्यायाधीश भारती चांडक व भारती डोंगरे यांच्या खंड पीठासमोर सुनावणी पार पडली. बंटी वडवेराव तर्फे अ‍ॅड. ऋषीकेश सोपान शिंदे व अ‍ॅड. रविराज सरवदे यांनी तर अंबादास जाधव या आरोपी साठी अ‍ॅड. अनिता अग्रवाल व इतर २ आरोपी साठी अ‍ॅड. फरहाना शाह यांनी बाजू मांडली.. या मधे अ‍ॅड. शिंदे यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. या प्रकरणामध्ये ओळख परेड ही सुमारे ५-६ महिन्यांनी झाली व गुन्ह्यातील चोरलेल्या दागिन्याची ओळख परेड देखील झाली नाही. तसेच या गुन्ह्यातील महत्वाचा प्रत्यक्ष दर्शनी साक्षीदार हा बागकाम करणारे बसप्पा धोत्रे यांनी सांगितले होते की, गुन्ह्याच्या आदल्या दिवशी आरोपी बंगल्याची रेकी करत होते व त्यांनी देखील पीडित व्यक्तींची विचारणा केली. अ‍ॅड. शिंदे यांनी हा मुद्दा खोडून काढत कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले की, या व्यक्तीच्या डोळ्याची शस्त्रक्रिया झाली आहे आणि त्यांची नजर कमजोर आहे . मग ही व्यक्ती ६ महिन्यांनी कशी काय ओळखू शकते? दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर अखेर आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. सरकारी वकील म्हणून एस. आर नगरकर यांनी काम पाहिले.

# कैद्यांच्या हाताने अनेकजण खुलवतात सौंदर्य !

## कैद्यांच्या मेन्स ‘ पार्लर’ चा निव्वळ नफा दोन लाख ३७ हजार

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील कैदी आता पुरूषांचे सौदर्य खुलवणत आहेत. राज्यातील पहिल्या मेन्स ‘पार्लर’चे उद्घाटन कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई यांच्या हस्ते २०१९ मध्ये करण्यात आले होते. पार्लरमध्ये कटिंग, दाढी, फेशियल पासून केसांना डाय लावून कैदी पुरूषांचे व्यक्तीमत्त्व खुलवत आहेत. येथील माफक दर व उत्कृष्ट सेवेमुळे वर्षभरात कैद्यांनी पार्लरच्या माध्यमातुन दोन लाख ३७ हजार रूपये निव्वळ नफा मिळवला आहे .

“येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या मागील बाजुस व कारागृह कर्मचारी वसाहतीच्या आवारातच ‘केश कर्तनालय’ कैदी चालवित आहेत. याठिकाणी बाजारभावापेक्षा कमी किंमत असल्यामुळे नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.वर्षभरात पार्लरच्या माध्यमातुन २ लाख ३७ हजार रूपये निव्वळ नफा मिळवला आहे. तर कैद्यांना ९५ हजार रूपये पगार दिला आहे.

- अनिल खामकर , अधीक्षक, येरवडा खुले कारागृह

येरवडा खुल्या कारागृहाच्या माध्यमातुन जेलरोड पोलीस चौकीच्या शेजारी ‘केश कर्तनालय’ सुरू करण्यात आले आहे. या केश कर्तनालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे. सुरवातीला हे केश कर्तनालय येरवडा मध्यवर्ती करागृहाच्या उद्योग विभागाच्या अंतर्गत होते. गेल्या ऑक्टोंबर पासून येरवडा खुल्या कारागृहाच्या अंतर्गत आले आहे.

या संदर्भात खुल्या कारागृहाचे अधिक्षक अनिल खामकर म्हणाले, “ कैद्यांची सुधारणा व पुनर्वसन’ हे कारागृहाचे ब्रिद वाक्य आहे. त्यासाठी कैद्यांना विविध उद्योगात गुंतविले जाते. त्यामुळे ते बाहेर पडल्यानंतर उद्योग व्यवसाय करून स्वत:च्या पायावर उभे राहून शकतात. कारागृहातील कैदी शेतीकाम, कारखाना, फर्निचर, कोल्हापूरी चप्पल पासून ते पैठणी साडी बनविण्याच्याचे काम करतात. मात्र ही सर्व कामे नागरिकांच्या दृष्टीक्षेपात येत नाहीत. कारागृहाच्या उद्योग विभागातील उत्पादन लोकांच्या पर्यंत पोचविण्यासाठी लाकडी



व लोखंडी फर्निचर, कापड, बेकरी उत्पादनासाठी विक्री केंद्रे आहेत. तर सेवा उद्योगा करीता कारागृहामार्फत इस्त्री, वाशिंग सेंटर सुरू होते. आता मात्र एक पाऊल पुढे टाकण्यासाठी ‘केश कर्तनालय’ सुरू करण्यात आले आहे. ”

# बहिणीच्या प्रेमसंबंधाला विरोध! भावानेच केला प्रियकराचा भर रस्त्यात खून, पुण्यातील धक्कादायक घटना

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे शहरात एक धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना घडली आहे. बहिणीच्या प्रेमसंबंधाला विरोध करत भावानेच तिच्या प्रियकराचा निर्घृण खून केलाय. शहरातील आंबेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील गुरुदत्त वॉशिंग सेंटर, गायमुख चौक, आंबेगाव परिसरात सोमवारी (२२ डिसेंबर) सायंकाळी हा प्रकार घडला.

जावेद खाजामियां पठाण (वय ३४, सध्या रा. नऱ्हेगाव, मूळ रा. मुदखेड रोड, ख्वाजा नगर, शनी मंदिराजवळ, भोकर, जि. नांदेड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी प्रेयसीचा भाऊ संदीप रंगराव भुरके (वय २५, रा. भोकर) याच्यासह आणखी एका आरोपीविरोधात आंबेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत व्यक्तीचा मित्र रौफ उस्मान शेख (वय ३५) यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत जावेद पठाण आणि संबंधित तरुणी हे दोघेही नांदेड जिल्ह्यातील भोकर येथील रहिवासी होते. दोघांची घरे एकमेकांच्या शेजारी असल्याने अनेक वर्षाची ओळख होती आणि त्यातूनच प्रेमसंबंध निर्माण झाले. मात्र हे प्रेमसंबंध



तरुणीचा भाऊ संदीप भुरके याला मान्य नव्हते.

दरम्यान ११ डिसेंबर रोजी जावेद आणि त्याची प्रेषित घरातून निघून पुण्यात आले आणि नऱ्हे परिसरात एकत्र राहू लागले. बहिण मुस्लिम प्रियकरासोबत पळून गेल्याचा राग संदीप भुरकेच्या मनात खदखदत होता. बहिण पुण्यात असल्याची माहिती मिळाल्यानंतर संदीप भुरके एका साथीदारासह पुण्यात आला. जावेद ज्या ठिकाणी राहत होता, त्या ठिकाणी जाऊन त्याने जावेदशी वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संदीपने धारदार शस्त्राने जावेदवर वार केले. डोक्यावर आणि इतर ठिकाणी गंभीर जखमी झाल्याने जावेद जागीच कोसळला. त्यानंतर आरोपी पळून गेले. गंभीर जखमी अवस्थेत जावेदला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र ससून रुग्णालय येथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

खून केल्यानंतर आरोपी संदीप भुरके आणि त्याचा साथीदार घटनास्थळावरून फरार झाले. आंबेगाव पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून आरोपींचा कसून शोध सुरू आहे. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांच्या टीम रवाना झाल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी दिली आहे. प्रेमसंबंधाला विरोधातून घडलेल्या या निर्घृण हत्येमुळे पुणे शहर हादरले असून, या घटनेवरून पुन्हा एकदा ऑनर किलिंगसारख्या घटनेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# पुणे तेथे काय उणे

### १) ओंकारेश्वर मंदिर

बाजीराव बल्लाळ यांचे बंधु चिमाजी आप्पा यांनी मुठा नदीकाठावर १ लक्ष रूपये खर्च करून ओंकारेश्वराचे मंदिर बांधले. मंदिराची बांधणी अष्टपैलू आहे. भिंती दगडाच्या असून खाली फरसबंदी आहे.आतील देवही पाषाणाच्या आहेत. देवळाला नऊ कळस असून मधला कळस सर्वात उंच आहे. देवळाच्या पुढे नंदीचे देवालय आहे. आतील बाजुस खणाच्या ओवऱ्या ( खोल्या) बांधल्या आहेत.यामध्ये निराश्रीत, विधवा, मधुकरी मागणारे विद्यार्थी इत्यादींना राहण्यासाठी बांधल्या आहेत. त्यावर चौफेर गच्ची केली आहे.

कोरोना संसर्गामुळे लागलेल्या लॉकडाऊनमध्ये अनेक निराश्रीतांनी ओंकारेश्वर मंदिरात आश्रय घेतला होता.

### २) पर्वती

पुण्याच्या वायव्य दिशेला पर्वती टेकडी आहे. याठिकाणी पर्वती नावाची देवी आहे. नानासाहेब पेशव्यांनी येथे देवदेवेश्वराचे मंदिर बांधले. टेकडीवर जाण्यासाठी १०३ पायऱ्या आहेत. पायऱ्या भव्य असून हत्तीवरून पर्वतीवर जाता येत होते. पानिपताच्या लढाईतील मराठ्यांच्या प्रचंड हानीमुळे खचून गेलेले नानासाहेब पेशव्यांचे निधन जून १९४९ मध्ये येथील होमशाळेत झाले. पर्वतीवर सुर्यनारायणाची मूर्ती, कार्तिक स्वामीं व विष्णू मंदिर आहे.

पर्वती मंदिराच्या मागील वाड्याच्या खिडकीत बसून दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी मराठे आणि ब्रिटीशांचे खडकीतील युध्द पाहिले असल्याचा दाखला इतिहासात मिळतो. दर श्रावणी सोमवारी पर्वतीवर जाणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी असते. तर पहाटे नियमित पर्वती टेकडीवर व्य जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

### ३) शनिवार वाडा

शनिवारवाडा हे पुण्याचे मानचिन्ह आहे. गतवैभवाची निशाणी आहे. येथे पेशवे म्हणजे छत्रपतींचे पंतप्रधान राहत असत. त्यांनी येथूनच मराठ्यांच्या साम्राज्याच्या अटकेपार झेंडा रोवला. मराठ्यांचा दरारा इंग्रजांना, दिल्लीश्वरांना, निजामांना दाखवला.

हा राजवाडा पराक्रमी थोरला बाजीराव पेशवे (१७२०-१७४०) यांनी बांधला. वाड्याचे क्षेत्रफळ सव्वा सहा अेकराचा आहे. वाड्याला पाच दरवाजे आहेत. मुख्य दरवाजा म्हणजे दिल्ली दरवाजा असून त्याची उंची २१ फूट व रूंदी १४ फूट आहे. दरवाज्याला १४४ लोखंडाचे सुळे बसविण्यात आले आहे. वाड्याची तटबंदी भिंत ३३ फूट उंच आहे. तटाचा माथा ११ फूट आहे. दिल्ली दरवाजा शेजारीच मस्तानी दरवाजा, पुढे पाहुण्यांसाठी खिडकी दरवाजा, पेशव्यांच्या स्त्रिया कसबा गणपतीसाठी दर्शनासाठी जाताना वापरत असलेला गणेश दरवाजा, ज्या दरवाजातून नारायणराव पेशवे यांचा खून झाल्यानंतर त्यांचा मृतदेह बाहेर काढला तो नारायण दरवाजा. सर्व भिंतीवर टेहळणीसाठी नऊ बुरूज होते. भिंतीमध्ये गवाक्षे आहेत. त्यामधून बाहेरील शत्रूवर गोळ्यांचा मारा करता येत होते. १८१८ साली शनिवारवाड्याला आग लागली होती. यामध्ये वाड्याचे मोठे नुकसान झाले.

### ४ ) बंडगार्डन धरण

ब्रिटीशांचे पुण्यात साम्राज्य विस्तार होत असताना त्यांनी येरवड्याची वाडी असलेल्या संगमवाडील जागा बॉम्बे सॅपर्ससाठी घेतली. सैन्य दलाचे प्रशिक्षण ठिकाणासह खडकीतील दारूगोळा कारखान्यासाठी मुबलक पाण्याची आवश्यकता होती. मुळा व मुठा नद्यांना पावसाळा वगळता जास्त पाणी नव्हते. त्यामुळे ब्रिटीशांनी सर तारापूरवाला यांना धरण बांधण्याची विनंती केली. १८६४ मध्ये धरण बांधण्यास दोन लाख रूपये खर्च आला होता. या धरणाला महात्मा जोतिबा फुले यांनी चुना व इतर साहित्य पुरवठा केल्याचा संदर्भ इतिहासात मिळतो. या धरणामुळे मुळा- मुठा नदीच्या तीन किलोमिटर पर्यंत पाण्याचा फुगवटा तयार झाला. त्यामुळे सहाजिकच बॉम्बे सॅपर्स व दारूगोळा कारखान्याला मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला.

बंडगार्डन धरणाच्या बंधाऱ्यावरून दोन दशकापूर्वी पाणी वाहत असे. मात्र सैन्यदलाने धरण फोडून दरवाजे करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर महापालिकेने नव्याने बंधारा बांधला असून तेथे पाच लोखंडी दरवाजे बसविले आहेत. धरणात शतकापूर्वी बोटक्लब व डेक्कन कॉलेजचे बोटक्लबच्या नौका विहार करीत असत.

### ५) विश्रामबाग वाडा

विश्रामबाग वाडा बांधण्या अगोदर येथे मोठी बाग होती. बागेचे नाव विश्राम होते. विश्रांतीचा बाग होता. हा वाडा १७९३ साली बांधला गेला. या वाड्यात तीन चौक होते. वाड्यात हौद, विहिर आणि दिवाणखाणा होता. हा वाडा मजबूत असून त्यात अनेक सोई सुविधा होत्या. त्याकाळी हा सरकारी वाडा होता. अर्थात येथे पेशव्याचे दप्तर काही काळ होता. आता वाड्यात महाराष्ट्र सरकारचे ग्रंथालय, टपाल कार्यालय आणि पुनवडी ते पुणे हे प्रदर्शन दालन आहे.

### ६) चतु:शृंगी मंदिर

पुण्याच्या उत्तरेला टेकडीवर चतु:शृंगी देवीचे मंदिर आहे. पुण्यातील त्याकाळचे सावकार दुर्लभशेट यांनी १७८६ मध्ये हे मंदिर बांधले. मंदिरात जाण्यासाठी दगडी पायऱ्या बांधल्या आहेत. मंदिराभोवती मोठा सभामंडप बांधला आहे. अनगळ घराण्याकडे या मंदिराची पिढयानपिढ्या सेवेचा मान आहे. दरवर्षी नवरात्रीला मंदिरात मोठी यात्रा भरते. भाविक नारळ्याचे तोरण देवीला वाहतात. पूर्वी शहरातील गणेशमंडळ देवीला नारळ्याचे तोरण वाहन्यासाठी रात्रभर मिरवणुका काढत. मात्र त्यावर आता बंदी आहे. त्यामुळे या मिरवणुका आता दिसत नाहीत.

### ७) तुळशी बाग

इ.स.१७६१ मध्ये तुळशी बाग बांधला. ज्या जागेवर तो बांधला तेथे शेजारी ओढा होता. त्यामागे तांबडी जोगेश्वरी मंदिर. तुळशी बाग तेथे पूर्वी तुळशींची बाग होती. ते तोडून देऊळ बांधले. येथे रामाचे मंदिर, सभामंडप, कारंजे आहे. देवळात पांढऱ्या पाषाणाच्या तीन मूर्ती आहेत. मध्ये राम, एका बाजुला सीता व दुसऱ्या बाजुला लक्ष्मण तर समोर काळ्या पाषाणातील हनुमानाची मूर्ती आहे.

तुळशी बाग ही समस्त महिला वर्गाची शॉपींगचे आवडते ठिकाण आहे. पर्यटक असो कि कोणी पुण्याला भेट देण्यासाठी येणाऱ्या महिला तुळशी बागेत खरेदी केल्याशिवाय जात नाहीत.

# सहा वर्षांत १८५६ कैदी उच्च शिक्षित



पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

राज्यातील कारागृहातील कैद्यांमध्ये अट्टल गुन्हेगार होण्याऱ्या टक्केवारीचे प्रमाण अधिक आहे. अनेक कैदी सुधार सेवेपासून लांब आहेत. त्यामुळे कैद्यांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडून त्याचा फायदा त्यांच्या कुटुंबाला होतो. यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व कारागृह विभाग यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. त्यामुळे कैद्यांना शिक्षणाची दारे उघडी झाले आहेत. कारागृहात येणारा बंदी हा समाजाचाच एक घटक असतो परंतु कळत नकळत त्याच्या हातून एखादा गुन्हा घडल्यानंतर त्यास कारागृहात शिक्षा भोगण्यासाठी बंदीस्त ठेवण्यात येते. बंदी कारागृहात आल्यानंतर त्याचे अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी कारागृहातच बंद्यांना उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व महाराष्ट्र कारागृह विभाग यांचेमध्ये सन २०१७ मध्ये सामंजस्य करार करण्यात आलेला होता.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातुन महाराष्ट्र राज्यातील एकुण २१९९ पुरुष बंदी व २०७ महिला बंदी असे एकुण २८५६ बंद्यांनी पदवी पूर्व परीक्षा, पदविका व पदवीचे शिक्षण प्राप्त केलेले आहे. नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांचे सोबत झालेल्या सामंजस्य कराराची मुदत संपल्याने पुन्हा करार करण्यात आला आहे. कारागृहाच्या प्रचलित धोरणानुसार कारागृहात राहुन मुक्त विद्यापीठामार्फत पदवीचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या बंद्यांना ९० दिवसापर्यंत माफी (शिक्षेत सुट) देण्यात येत असून आतापर्यंत एकूण २१४ बंद्यांना ९० दिवस माफीचा लाभ देण्यात आलेला आहे व या पदवीधर बंद्यांपैकी एकुण १६ बंद्यांनी उच्च पदवी शिक्षणक्रम पूर्ण केल्याने त्यांना पुन्हा ९० दिवसांची माफी देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत येरवडा, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, मुंबई, तळोजा, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या मध्यवर्ती कारागृह व कल्याण जिल्हा कारागृह अशा एकुण १० कारागृहात विद्यापीठाचे अभ्यासकेंद्रे आहेत. शैक्षणिक अभ्यासक्रमात मुख्यत: बीए, बी.कॉम, एम.एम. एम. कॉम हे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम व आरोग्यमित्र, योगशिक्षक, बालसंगोपन आणि रंजन शिक्षण, मानवी हक्क, गांधी विचार दर्शन यासारखे प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच ब्युटीपार्लर, वॉटर मॅनेजमेंट, डिजिटल फोटोग्राफी, व्हिडिओ प्रोडक्शन, इलेक्ट्रीशियन, होम अप्लाएन्स दुरूस्ती इ. कौशल्याधारित अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शिक्षणामुळे कारागृहातील बंद्यांना तुरुंगातुन मुक्त झाल्यानंतर चांगले जीवन जगण्याची संधी मिळते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक सुविधा देत असतांना कारागृह विभागातील बंद्यांचा देखील विशेष लक्ष गट म्हणून समावेश केलेला असल्याने त्यांचे ‘ज्ञानगंगा घरोघरी’ हे ब्रीद या अर्थाने निश्चितच सार्थकी ठरत आहे.